स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती

(पीएच.डी) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

द्राक्ष निर्यातीची नाशिक जिल्ह्याच्या विकासातील भूमिका

(2013 ते 2023)

संशोधक

दिपक दगडू हिरे

एमए बी.एड (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. रामदास धोंडबाराव मुक्टे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

शिवाजी महाविद्यालय , हिंगोली

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्र विद्या संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

जानेवारी 2024

➢ **प्रस्तावना**

भारत हा कृषिप्रधान देश आहे भारतातील सुमारे 67 प्रतिशत लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करत आहे. भारतातील लोकसंख्येपैकी सुमारे 58% लोक त्यांच्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत.थोडक्यात शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा असल्यामुळे शेती क्षेत्रात मूलभूत सुधारणा व अमूलग्राम परिवर्तन घडवून येणे आवश्यक आहे.

भारत हा जगातील सर्वात मोठ्या द्राक्ष उत्पादक देशांपैकी एक आहे. भारतातील विविध राज्यांमध्ये द्राक्षाचे पीक घेतले जाते. महाराष्ट्र हे सर्वात मोठे द्राक्ष उत्पादक राज्य आहे. भारतातील इतर प्रमुख द्राक्ष उत्पादक राज्यांमध्ये कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि तेलंगणा यांचा समावेश आहे. सोनाका, थॉम्पसन सीडलेस, अनाबेशाही शरद सीडलेस आणि माणिक चमन या द्राक्षाच्या जातींचे भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. भारतातील द्राक्षाची लागवड मुख्यतः व्यावसायिक स्तरावर केली जाते.

भारतातील द्राक्ष हंगाम साधारणपणे डिसेंबरमध्ये सुरू होतो आणि मे पर्यंत चालतो. आधुनिक लागवड तंत्राचा अवलंब, उत्तम पायाभूत सुविधा आणि परदेशी बाजारपेठेत वाढलेली निर्यात यामुळे भारतीय द्राक्ष उद्योगात अलीकडच्या काळात लक्षणीय वाढ झाली आहे. अलिकडच्या वर्षांत भारतातून द्राक्षांची निर्यात झपाट्याने वाढत आहे. भारतीय द्राक्षांची प्रमुख निर्यात स्थळांमध्ये संयुक्त अरब, नेदरलँड्स, युनायटेड किंगडम, बांगलादेश आणि सौदी अरेबिया यांचा समावेश होतो. भारतातील द्राक्ष उद्योगाला विविध आव्हानांचा सामना करावा लागतो, ज्यात रोग आणि कीटक व्यवस्थापन, आधुनिक साठवण व्यवस्थांचा अभाव, वाहतूक व पायाभूत सुविधांचा अभाव आणि किंमतीतील अस्थिरता यांचा समावेश आहे. तथापि या आव्हानांवर मात करण्यासाठी आणि देशातील द्राक्ष उद्योगाच्या वाढीला पाठिंबा देण्यासाठी सरकार आणि खाजगी क्षेत्र एकत्र काम करत आहेत.

राज्यातील विविध फळ पिकांमधील द्राक्ष या फळ पिकाने जी प्रगती केली आहे ती उल्लेखनीय आहे. यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ हॉर्टिकल्चर रिसर्च बेंगलुरू व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि महाराष्ट्र राज्याचा कृषी विभाग यांनी वेळोवेळी केलेली मदत यामुळे द्राक्ष उत्पादनात प्रगती झालेली आहे.

➢ **भारतीय द्राक्ष उत्पादनाचा इतिहास:-**

व्हायटेसी कुलातील व्हायटिस प्रजातीतील वनस्पतीच्या फळांना सामान्यपणे द्राक्ष म्हणतात. जगभर या वनस्पतीच्या सु. ६० जाती आहेत. मोठ्या प्रमाणात लागवडीखाली असलेल्या द्राक्षवेलीचे शास्त्रीय नाव व्हायटिस व्हिनिफेरा आहे. इतर दोन

महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या जाती उत्तर अमेरिकेतील (व्हा. ल्युब्रास्का आणि व्हा. रोटुंडीफोलिया) आहेत.

द्राक्षाचे मूळ स्थान रशिया मधील अरमेनिया जिल्हा आहे. भारतात द्राक्षाचा प्रसार इराण आणि अफगाणिस्तानातून झाला. भारतात प्राचीन काळापासून द्राक्षांची लागवड केली जात आहे. पुरातत्वीय पुराव्यांनुसार, भारतात इ. स. १३०० च्या सुमारास इराण व अफगणिस्तान येथून द्राक्षवेल आली, असे मानतात. भारतातील द्राक्ष लागवडीचा पहिला उल्लेख ऋग्वेद आणि महाभारत यांसारख्या प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये आढळतो. ऐतिहासिकदृष्ट्या, भारतातील द्राक्षाची लागवड देशाच्या वायव्य भागात, विशेषतः महाराष्ट्र आणि
कर्नाटक राज्यांमध्ये केंद्रित होती. 20 व्या शतकाच्या सुरुवातीस फायलोक्सेरा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रोगाने भारतात द्राक्षाचे उत्पादन उद्ध्वस्त केले आणि 1960 च्या दशकापर्यंत द्राक्षाची लागवड पूर्ववत होऊ लागली. तेव्हापासून भारतीय द्राक्ष उद्योगात लक्षणीय वाढ झाली आहे. आज भारत हा जगातील सर्वोच्च द्राक्ष उत्पादक देशांपैकी एक आहे. ज्यात दरवर्षी 2 दशलक्ष मेट्रिक टन द्राक्षांचे उत्पादन होते. महाराष्ट्र हे भारतातील सर्वात मोठे द्राक्ष उत्पादक राज्य आहे, जे देशाच्या एकूण द्राक्ष उत्पादनापैकी निम्म्याहून अधिक आहे. भारतात उगवलेली बहुतांश द्राक्षे ही टेबल द्राक्षे आहेत जी वापरासाठी ताजी विकली जातात. तथापि भारतात वाइन उत्पादनासाठी विशेषत: महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात द्राक्षांचे उत्पादन होते. भारत सरकारने द्राक्ष उद्योगाच्या वाढीस पाठिंबा देण्यासाठी धोरणे लागू केली आहेत ज्यात द्राक्ष उत्पादकांना अनुदान आणि द्राक्ष प्रक्रिया आणि साठवण सुविधा सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश आहे.

भारतातील शेतीचे जमिनीनुसार पिकानुसार हवामानानुसार प्रकार आहेत. त्यातील एक प्रकार म्हणजे फळबाग शेती हा आहे या प्रकारातील शेतीत मुख्य उत्पादन फळे असतात यामध्ये आंबा, डाळिंब, पेरू, पपई, सिताफळ, द्राक्ष या पिकांची शेती केली जाते. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतकरी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात प्रगतीपथावर आहेत त्यामुळे फलोत्पादनाच्या बाबतीत राज्याने देशपातळीवर इतर राज्यांच्या तुलनेत क्रांतिकारक प्रगती केलेली आहे राज्यामध्ये सण 1909 मध्ये कृषी विभागाची स्थापना झाल्यापासून फलोत्पादन विभाग हा कृषी विद्यापीठातील एक महत्त्वाचा भाग गणला जातो. राज्याच्या सकल उत्पादनामध्ये फलोत्पादनाचा वाटा निश्चितच महत्त्वाचा राहिलेला आहे सन 1982 मध्ये फलोत्पादन विभाग कृषी विभागातून वेगळा करून फलोत्पादन संचालनालयाची स्थापना करण्यात आली होती त्या कालावधीत उत्पादन विभागामार्फत फळे भाजीपाला व फुल पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढीच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या योजना राबवल्या गेल्यामुळे

फलोउत्पादनाच्या प्रगतीस चांगली चालना मिळाली.त्यानंतर 1991-92 मध्ये महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीची योजना सुरू केल्यामुळे फलोत्पादन क्षेत्र विस्तारास चांगली चालना मिळाली व देशात राज्य फलोत्पादन पिकांमध्ये अग्रगण्य ठरले. सन 1998 मध्ये कृषी विभागाचे पुनर्रचना होऊन एक खिडकी अंतर्गत सर्व विभाग एकत्रित करण्यात आले त्या वेळे पासून फलोत्पादन हा कृषी विभागाचा एक विभाज्य भाग झाला आहे फलोत्पादन विभागाच्या विविध योजना आता कृषी विभागामार्फत राबवल्या जात आहेत. देशात द्राक्ष उत्पादनात महाराष्ट्र अव्वल राज्यातील एकूण द्राक्ष निर्यातीपैकी नाशिक जिल्ह्याचा वाटा 91 टक्के आहे. जिल्ह्यामध्ये द्राक्षाच्या उत्पादनाचे एकूण क्षेत्र 62 हजार 982 हेक्टर एवढे आहे .नाशिकची द्राक्ष युरोपियन देशांसह रशिया चीन कॅनडा दुबई जर्मनी मलेशिया,बेल्जियम, युके,डेनमार्क आदी देशात निर्यात केली जातात. जागतिक बाजारपेठेत भारतीय (महाराष्ट्र) द्राक्षांची मागणी टिकून राहावी यासाठी कृषी विभागाने द्राक्ष निर्यातीबाबत निकष ठरवलेले आहेत.नाशिक जिल्ह्यात कृषी क्षेत्रात निर्माण झालेली सर्वात मोठी समस्या म्हणजे 75 टक्के शेतकऱ्यांकडे एक हेक्टर पेक्षा कमी जमीन असल्यामुळे उत्पादन कमी होते परिणामी निर्यात कमी होऊन फायदा ही किरकोळ होतो.

भारतात सोनाका,थॉम्पसन सीडलेस, बेंगलोर ब्लू, अनाबेशाही, शरद सीडलेस आणि माणिक चमन या जातींच्या द्राक्षांचे उत्पादन घेतले जाते. भारतात द्राक्षाची लागवड मुख्यतः व्यावसायिक स्तरावर केली जाते. मोठ्या शेतात आणि द्राक्षबाग देशभर पसरलेल्या आहेत. आधुनिक लागवड तंत्राचा अवलंब उत्तम पायाभूत सुविधा आणि परदेशी बाजारपेठेत वाढलेली निर्यात यामुळे भारतीय द्राक्ष उद्योगात अलीकडच्या काळात लक्षणीय वाढ झाली आहे. अलीकडच्या वर्षात भारतातून द्राक्षाची निर्यात झपाट्याने वाढत आहे भारतीय द्राक्षाची प्रमुख निर्यात स्थळ मध्ये युरोपियन देशांसह रशिया चीन कॅनडा दुबई जर्मनी मलेशिया,बेल्जियम, युके,डेनमार्क यांचा समावेश होतो. भारतातील द्राक्ष उद्योगाला विविध आव्हानांचा सामना करावा लागतो ज्यात रोग आणि कीटक व्यवस्थापन पुरेशा साठवण आणि वाहतुकीच्या पायाभूत सुविधांचा अभाव आणि किमतीतील अस्थिरता यांचा समावेश आहे.

- **भारतातील द्राक्षे उत्पादन करणारी राज्ये :-**

भारतात द्राक्षे प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू आणि पंजाब या राज्यांमध्ये घेतली जातात. महाराष्ट्र हे भारतातील द्राक्ष उत्पादनात आघाडीवर आहे, देशातील एकूण द्राक्ष उत्पादनापैकी सुमारे 81% उत्पादन होते. महाराष्ट्रातील नाशिक आणि सांगली जिल्हे द्राक्ष उत्पादनासाठी ओळखले जातात. कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा,

तामिळनाडू आणि पंजाब यांसारखी इतर राज्ये देखील द्राक्षांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करतात.

➢ **द्राक्ष उत्पादनात महाराष्ट्रातील अव्वल जिल्हे:-**

महाराष्ट्र हे भारतातील अग्रगण्य द्राक्ष उत्पादक राज्य आहे. महाराष्ट्रातील काही प्रमुख द्राक्ष उत्पादक जिल्हे आहेत. नाशिक हा पश्चिम भारतातील महाराष्ट्रातील सर्वात मोठा द्राक्ष उत्पादक जिल्हा आहे. नाशिक हे द्राक्ष लागवडीसाठी ओळखले जाते आणि "भारताची वाईन कॅपिटल" म्हणून ओळखले जाते. शहराला द्राक्ष शेतीचा मोठा इतिहास आहे आणि अनुकूल हवामान आणि मातीच्या परिस्थितीमुळे ते द्राक्ष लागवडीसाठी एक प्रमुख स्थान बनले आहे आणि थॉम्पसन सीडलेस, शरद सीडलेस, सोनाका आणि माणिक चमन यासह विविध प्रकारच्या द्राक्षांचे उत्पादन करतात नाशिकचे वार्षिक द्राक्ष उत्पादन हवामान शेती पद्धती आणि बाजारपेठेतील मागणी यासारख्या विविध घटकांवर अवलंबून असते. तथापि अलीकडील अंदाजानुसार नाशिकमध्ये दरवर्षी सुमारे 1.5 दशलक्ष मेट्रिक टन द्राक्षांचे उत्पादन होते. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार, नाशिक जिल्ह्यात 2019-2020 मध्ये वार्षिक द्राक्ष उत्पादन सुमारे 1 लाख 16 हजार 767 टन होते. तथापि हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की हवामानाची परिस्थिती कीटकांचा प्रादुर्भाव आणि रोगाचा प्रादुर्भाव यासारख्या विविध घटकातील बदलामुळे द्राक्षाचे उत्पादन वर्षानुवर्षे बदलू शकते.

सांगली हा महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचा द्राक्ष उत्पादक जिल्हा आहे. पश्चिम भारतातील जिल्हा आहे. हा जिल्हा सुपीक माती आणि अनुकूल हवामान परिस्थितीसाठी ओळखला जातो. सांगली हे पश्चिम घाट पर्वत रांगेत वसलेले असून दख्खनच्या पठाराचा भाग आहे. जिल्ह्यात थॉम्पसन सीडलेस, शरद सीडलेस, माणिक चमन आणि सोनाका यासह अनेक द्राक्षांच्या जाती आहेत. सांगलीतील द्राक्षे हे एक महत्त्वाचे कृषी पीक आहे, अनेक शेतकरी त्यांच्या उपजीविकेसाठी त्यांच्यावर अवलंबून आहेत. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाईनरी आहेत ज्या परिसरात पिकवलेल्या द्राक्षांपासून विविध प्रकारच्या वाइन तयार करतात. सांगलीत द्राक्ष पिकवण्याचा हंगाम साधारणपणे जानेवारीमध्ये सुरू होतो आणि तो मे पर्यंत चालतो. या काळात द्राक्षे काढली जातात आणि देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारात विकली जातात. भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार सांगलीमध्ये 2020-21 या वर्षासाठी वार्षिक द्राक्ष उत्पादन 70,200 हेक्टर क्षेत्रातून सुमारे 6.86 लाख टन (686,000 टन) होते. सोलापूर हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील जिल्हा आहे. हे द्राक्ष उत्पादनासाठी ओळखले जाते आणि भारतातील प्रमुख द्राक्ष उत्पादक प्रदेशांपैकी एक मानले जाते.सोलापूरमधील द्राक्षाच्या लागवडीला मोठा इतिहास आहे..सोलापुरात थॉम्पसन सीडलेस,

शरद सीडलेस, सोनाका या मुख्य द्राक्षाच्या जाती आहेत. ही द्राक्षे मुख्यतः टेबल वापर रस उत्पादन आणि वाइन तयार करण्यासाठी वापरली जातात. या वेळी जिल्ह्यात द्राक्ष खरेदी-विक्रीसाठी शेतकरी आणि व्यापाऱ्यांची गर्दी असते..सोलापुरातील द्राक्ष लागवडीमुळे या प्रदेशाच्या आर्थिक विकासात मदत झाली तर स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. तसेच भारतातील प्रमुख द्राक्ष उत्पादक प्रदेश म्हणून सोलापूरला नकाशावर आणले आहे.

पुणे हे महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील भारतातील एक शहर आहे आणि ते राज्यातील जिल्ह्याचे नाव देखील आहे. पुणे जिल्हा शहराच्या सभोवतालच्या डोंगराळ भागात पिकवल्या जाणाऱ्या द्राक्षांच्या उत्पादनासाठी ओळखला जातो. या प्रदेशात उत्पादित द्राक्षे उच्च दर्जाची आहेत आणि वाइन आणि मनुका यासह विविध उत्पादने तयार करण्यासाठी वापरली जातात. जिल्ह्यातील हवामान आणि मातीची परिस्थिती द्राक्ष लागवडीसाठी आदर्श आहे आणि परिणामी द्राक्ष शेती हा स्थानिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे.. जिल्ह्यात थॉम्पसन सीडलेस, सोनाका आणि शरद सीडलेस या लोकप्रिय जातींसह विविध प्रकारच्या द्राक्षांचे उत्पादन केले जाते. सुमारे 200,000 मेट्रिक टन वार्षिक द्राक्ष उत्पादन. या प्रदेशात द्राक्षे प्रामुख्याने टेबल वापर आणि वाइन उत्पादनासाठी घेतली जातात.या जिल्ह्यांमध्ये द्राक्ष लागवडीसाठी अनुकूल हवामान आणि मातीची गुणवत्ता आहे ज्यामुळे त्यांच्या उच्च उत्पादन पातळीला हातभार लागला आहे.

- **संशोधनाचे महत्त्व:-**

नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर द्राक्ष उत्पादन होते तसेच उत्पादन आणि निर्यात यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार प्राप्त होतो त्यामुळे पेट सुरगाणा या भागातील अनेक कामगार ऑक्टोबर ते एप्रिल या काळात निफाड दिंडोरी चांदवड बसवंत पिंपळगाव या भागात वास्तव्यास असतात.

वरील तालुक्यात द्राक्ष उत्पादन हे प्रामुख्याने शेतकरी वैयक्तिक मालकीच्या शेतीमध्ये करतात स्वतः आणि व्यापाऱ्यांच्या माध्यमातून निर्यात करतात तसेच या भागात निर्यात केंद्र देखील आहेत या सर्व प्रक्रियेत उत्पादक आणि निर्यातदार यांना होणारे लाख तसेच निर्यातीतून मिळणारे आंतरराष्ट्रीय चलन आणि भारताच्या एकूण आयात निर्यातीत जिल्ह्यातील द्राक्ष निर्यातीचा काय वाटा आहे ? हे या अभ्यासावरून स्पष्ट होईल . जागतिकीकरणामुळे जिल्ह्यातील द्राक्ष निर्यातीला मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड देण्याची स्थिती निर्माण झाली आहे. अशा स्थितीत जिल्ह्यातील वास्तव स्थिती या संशोधनाच्या माध्यमातून विश्लेषित होईल. द्राक्ष निर्यातीच्या बरोबरच एकूण कृषी क्षेत्रातील उत्पादनाच्या निर्यातीचे आंतरराष्ट्रीय

स्थिती प्रस्तुत संशोधनातून लक्षात येऊ शकते. तसेच निर्यातीमधील असलेल्या अडचणी समस्या यावर प्रकाश टाकला जाईल. व यातील उपाययोजना ह्या निश्चितपणे आंतरराष्ट्रीय कृषी उत्पादनाचे निर्यातीचे धोरण ठरवण्यात एक दिशादर्शक घटक होईल.

जिल्ह्यातील द्राक्ष पिका खालील क्षेत्र वाढतच आहे तसेच निर्यातीतील देखील वाढ होत आहे द्राक्ष शेतीतील होणारी भांडवली गुंतवणूक, सरासरी उत्पादन ,खर्च विक्री, विपणन पद्धती, विक्री व्यवस्था खर्च ,प्राप्ती,उत्पादन ,उत्पन्न, किंमत इत्यादी विषयक प्रश्नांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

- **संशोधनाची आवश्यकता आणि विषयाची निवड :-**

नाशिक जिल्ह्यामध्ये द्राक्ष निर्यातीचे अस्तित्व हे सरकारी धोरण आयातदार देशाचे आयती विषयक धोरण यावर अवलंबून आहे यामुळे जागतिकीकरणातील स्पर्धेला तोंड देण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या सर्व समस्यांवर उपाययोजनाची आवश्यकता निर्माण झाली आहे. म्हणून सदर विषयाची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचा देशामध्ये द्राक्ष उत्पादनात प्रथम क्रमांक असून त्यात नाशिकची ओळख द्राक्ष पंढरी म्हणून आहे. नाशिक जिल्ह्यात 62 हजार 982 हेक्टर क्षेत्रावर द्राक्षाची लागवड केली जाते.तसेच नाशिक जिल्ह्यातील हवामान द्राक्षासाठी अनुकूल असून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निर्यात क्षम द्राक्षाचे उत्पादन घेतले जाते. या पिकाचे उत्पादन घेत असताना शेतकऱ्यांना पर्यावरण, अवकाळी पाऊस, कोरोना, युद्धजन्य परिस्थिती,योग्य किमतीचा अभाव,बाजारपेठ, अस्थिर किमती या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केलेला आहे. या आर्थिक परिवर्तनाच्या नव्या परिस्थितीत शेती क्षेत्रासह इतर क्षेत्रांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. खाजगीकरण उदारीकरण जागतिकीकरण यामधून निर्माण झालेली मुक्त व्यापार व्यवसायामुळे परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. WTO च्या धोरणानुसार कृषी देखील व्यापारासाठी खुले केले आहे. त्यामुळे भारतातील शेतीला व द्राक्षांना जगातील इतर देशांबरोबर स्पर्धा करावी लागत आहे. ग्लोबल वार्मिंग चा परिणाम म्हणून हवामान बदलामुळे द्राक्ष उत्पादन व निर्याती विषयी अनिश्चित परिस्थिती निर्माण झाली आहे. या सर्व घडामोडींचा विचार करून व झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीत आपले अस्तित्व निश्चयपूर्वक कायम राखण्यासाठी आणि बदलांना तोंड देत त्यांच्याशी योग्य रीतीने जोडून घेत विकास साध्य करण्यासाठी द्राक्ष उत्पादकांना व निर्यातदारांना आपला चेहरा मोहरा बदलावा लागणार आहे. सहाजिकच संशोधकांच्या मनात सदर विषयाबाबत तीव्र जिज्ञासा निर्माण झाली आहे.

द्राक्षाच्या विपणनाच्या बाबतीत जर विचार केला तर द्राक्षाचे विपनण हे शिवार सौदापद्धतीने मोठ्या प्रमाणावर होते. अनेक परप्रांतीय व्यापारी द्राक्षांची शेतातच खरेदी करतात त्याच्या बद्दल कोणतीही शाश्वती नसते. त्यांची नोंदणी झालेली नसते असे व्यापारी शेतकऱ्यांचा माल घेऊन.त्यांच्या मालाची किंमत न देता आपल्या प्रांतात पळ काढतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. कारण द्राक्ष हे वार्षिक पीक आहे. अनेक कुटुंबांचे अस्तित्व त्याच पिकांच्या उत्पन्नावर अवलंबुन आहे. तसेच द्राक्ष उत्पादनाचा जरी विचार केला तरी भयान वादळ, बेमोसमी (अवकाळी) पाऊस, ग्लोबल वार्मिंग यामुळे सातत्याने होणाऱ्या हवामानातील बदल यामुळे द्राक्षाच्या उत्पादनात अनिश्चितता निर्माण झाली आहे. तसेच अनेक आंतरराष्ट्रीय व्यापारातील किचकट अटीमुळे निर्यातीमध्ये देखील अनिश्चितता निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ 2009-10 मध्ये युरोपने भारतीय द्राक्षात कोलोमेकर चे अवशेष आढळल्यामुळे भारतीय द्राक्षांना रोखले होते आणि पंधराशे कंटेनर परत पाठवले होते. या दुर्घटनेने 350 कोटीचा फटका भारतीय द्राक्ष उत्पादकांसह निर्यातदारांना सहन करावा लागला होता.नेदरलँड व जर्मनी या प्रमुख बाजारपेठांमध्ये भारतीय द्राक्षांची प्रतिमा खालावली या घटनेनंतर दुसऱ्या वर्षी म्हणजेच 2010-11 मध्ये जर्मनीने अन्य युरोपियन देशांच्या तुलनेने भारतीय द्राक्ष अल्प प्रमाणात स्वीकारली. 2010-11 या वर्षीच्या द्राक्ष हंगामात जर्मनीला एकूण 375 मे.टन (31कंटेनर) इतकीच द्राक्ष निर्यात झाली. अशा स्थितीत नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष निर्यातीवर काय परिणाम झालेला आहे. उत्पादक निर्यातदार यांना झालेल्या लाभाचा -नुकसानीच्या अभ्यासाची तसेच देशाच्या एकूण निर्यातीमध्ये जिल्ह्यातील द्राक्ष निर्यातीची भूमिका काय आहे हे लक्षात घेऊन द्राक्ष निर्यातीचा नाशिक जिल्ह्याच्या विकासातील भूमिका प्रस्तुत विषयाची निवड केलेली असून **संशोधनाचा कालावधी 2013 ते 2023 आहे.**

- **संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. द्राक्ष निर्यातीची नाशिक जिल्ह्याच्या विकासातील योगदानाचा अभ्यास करणे
2. नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादनाचा राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तरावरील निर्यातीचा अभ्यास करणे.
3. द्राक्ष उत्पादनक्षेत्रावर होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न यांचा अभ्यास करणे.
4. द्राक्ष निर्यातदरांच्या समस्यांचा अभ्यास करणे
5 द्राक्ष निर्याती संदर्भातील शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
6. द्राक्ष निर्याती संदर्भातील समस्या वर उपाय योजना सुचवणे.

- **गृहीते-**

1 नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष हे प्रमुख पीक आहे.

2 वाढती मागणी व आधुनिक तंत्रज्ञान, विक्री व्यवस्थापना मधील सुधारणा यामुळे जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादनामध्ये व लागवडक्षेत्रमध्ये वाढ झाली आहे.

3 द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यां च्या उत्पादनामध्ये चांगल्या पद्धतीने वाढ झाली आहे.

4. द्राक्षांची राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाढती मागणी यामुळे निर्यातीत वाढ होत आहे.

5 नैसर्गिक संकटे बाजारपेठ चा अभाव यामुळे अनेक वेळा उत्पादन खर्चपेक्षा कमी उत्पन्न मिळते,शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

6 द्राक्ष निर्मिती शेतकऱ्यांचे निसर्ग संकटामुळे होणारे नुकसान भरपाई शासनाकडून अल्प प्रमाणात मिळते

किंवा अनेक वेळेला मिळतही नाही.

7. द्राक्ष निर्याती संदर्भातील शासनाचे धोरण अपेक्षेप्रमाणे अनुकूल नाही.

8 द्राक्ष विक्री बाजारपेठेत दलालांचा मोठा प्रभाव आहे.

- **संशोधन पद्धती:-**

संशोधन प्रकार हा सखोल अध्ययनाचा असून सदर संशोधन विश्लेषणात्मक व वर्णनात्मक स्वरूपाचे आहे. संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला येईल. सदर अध्ययन प्राथमिक व द्वितीय सामग्रीवर आधारलेले आहे. प्रथम स्तरावर महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागातदार संघ व कृषी आयुक्तालयाच्या पदाधिकाऱ्यांची चर्चा करून द्राक्ष उत्पादक तुलनेने अधिक असलेल्या नाशिक जिल्ह्यातील नऊ तालुक्यांची हेतूत: निवडण्यात आली **आहे**.

संशोधन पद्धतीत (1) वर्णनात्मक पद्धती (2) सांख्यिकीय पद्धत अशा दोन पद्धती वापरल्या जातात त्यात सांख्यिकीय पातळी तपासण्यासाठी मध्य, मध्यगा,मध्यमान, प्रमाण विचलन, या सांख्यिकीय साधनांचा वापर करता येईल त्यामुळे सरासरी उत्पन्न व खर्च पातळी आणि गुंतवणूक इत्यादींची सखोल माहिती मिळवता येईल,. या संशोधनासाठी नमुना निवड करताना नाशिक जिल्ह्यातील निफाड, बसवंत पिंपळगाव,दिंडोरी,चांदवड,नाशिक या तालुक्यातील द्राक्ष उत्पादकांची निवड करून अभ्यास करता येईल. त्यात. संशोधनासाठी आवश्यक सामग्रीच्या माध्यमातून तथ्य संकलित करण्यात येतील. प्राथमिक साधनसामग्री व दुय्यम सामग्री यांचा अभ्यास आणि निरीक्षणातून गोळा केलेल्या प्राथमिक डेटा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष व्यक्तींची मुलाखत घेण्यासाठी विस्तृत आणि सर्वसमावेशक प्रश्नावली तयार केली जाईल. संदर्भ ग्रंथ मासिके वर्तमानपत्रे संशोधन अहवाल प्रोजेक्ट रिपोर्ट आणि इतर घटकातून माहिती संकलित करून सदर संशोधन केले जाणार आहे. सदर संशोधनामध्ये 300 निर्यातदारांकडून प्राथमिक माहिती जमा केली जाईल.

- प्रकरणांची रूपरेषा **:-**

प्रस्तुत संशोधन विषयाचे पैलू लक्षात घेऊन अभ्यासाकरता प्रकरण मांडणी सहा प्रकरणांमध्ये केलेली आहे ती पुढील प्रमाणे

1) प्रस्तावना

2) संशोधन साहित्याचा आढावा

3) नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष पिकाखालील क्षेत्र व द्राक्ष उत्पादन

4) जिल्ह्यातील द्राक्ष निर्यात

5) द्राक्ष उत्पादकांना निर्यातीमुळे होणारे लाभ

6) निष्कर्ष व शिफारशी

➢ संदर्भसूची :-

1)प्रतियोगिता दर्पण, सामान्य अध्ययन,भारतीय अर्थव्यवस्था, अतिरिक्त Code NO 791, Page-100

2)यादव दादाभाऊ, दुरंगी जितेंद्र, 'द्राक्ष निर्यातीसाठी नवीन बाजारपेठांचा शोध हवा ' सकाळ अॅग्रोवन मंगळवार 31 जुलै 2012

3)मुंडले मंदार, "द्राक्ष निर्यात आश्वासक, गरज सक्षम ब्रॅण्डिंगची" दैनिक सकाळ अॅग्रोवन,मंगळवार दि. 17 एप्रिल 2012 पान नंबर 4

4) जोशी बी.एस., 'भारतीय शेती क्षेत्राच्या समस्या' बी आर पब्लिकेशन, नवी दिल्ली

5) देसाई एम.बी., 'भारतीय शेतीचा विकास आणि भवितव्य' हिमालय पब्लिकेशन हाऊस, नवी दिल्ली.

6) 'नाशिक जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन '2018

7) www.agriculture.com

8) द्राक्ष संशोधनाचा मागवा सद्यस्थिती व भविष्यातील वाटचाल

संशोधक   मार्गदर्शक

दिपक दगडू हिरे   डॉ. आर.डी.मुक्ते